|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)



## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

**जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./ज्ये.ना./०५/ २०२१** **दि.२९/०१/२०२१**

**प्रति,**

**मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/समन्वयक**
**कबचौउमविशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये,**
**मान्यता प्राप्त परीसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना..**

**विषय :-ज्येष्ठ नागरीकांसाठी विविध उपक्रम राबविणेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत..**

**महोदय,**

आपणास विदितच आहे की, जगभर कोरोना या विषाणू संसर्ग आजाराने थैमान घातलेले असून सदर आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी भारत सरकार त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकार सुध्दा विविध पातळीवरुन प्रयत्न करीत आहे.

विद्यापीठ हे समाजातील शिक्षण-प्रशिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. औपचारीक अशा पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या माध्यमातुन विद्यार्थी वर्गाला व समाजातील विविध घटकांना शिक्षित व सक्षम बनवण्याचे कार्य विद्यापीठ करतच असते. शिक्षणाबरोबरीनेच इतर सामाजिकदृष्टया महत्वाचे पूरक कार्यक्रम करुन विद्यार्थी व समाजातील विविध घटकांमध्ये सामाजिक जबाबदारीचे भान व जाणिव निर्माण करणे अत्यावश्यक असते. अशा पूरक कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग घेऊन, सामिल होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास त्याच बरोबर ज्येष्ठ नागरीकांचा आरोग्याची काळजी घेण्यास हातभार लागत असतो.

कोरोना या विषाणू संसर्ग आजाराने थैमान घातलेले असल्याने शाळा, महाविद्यालये व विद्यापीठ गेल्या अनेक महिन्यांपासून बंद होते कोरोनाचे प्रमाण जरी कमी होत असून अशी परिस्थीती अजून किती दिवस असेल ते सांगता येणार नाही तसेच कोरोना या संसर्गजन्य विषाणू पासून बचाव करण्यासाठी जगभर मोठयाप्रमाणात लसीकरण सुरु असुन या आजारापासून मुक्ती मिळविण्यासाठी जगभरातील अनेक देशातील शास्त्रज्ञ अहोरात्र प्रयत्न करीत आहेत.

त्या अनुषंगाने कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे बरेच दिवस जनजिवन ठप्प झाले होते त्याच बरोबर शाळा व महाविद्यालय बंद होती. या काळात सर्वात जास्त मानसिक व शारिरीक त्रास हा वयोवृध्दज्येष्ठ नागरीकांना झाला असून त्यांना अनेक संकटाना सामोरे जावे लागले. महाराष्ट्र शासनाच्या 'मिशन बिगिन अगेन' या ध्येयानुसार आपणही पूढाकार घेऊन समाजातील जेष्ठ व वयोवृध्द इतर गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवू शकतात. जसे आरोग्य शिबीर, व्याख्यान व चर्चासत्र किंवा या बाबतीत आपल्या काही नवनविन संकल्पना असतील त्यानूसार आपण कार्यक्रमाचे आयोजन करु शकतात. योग्य त्या प्रस्तावांसाठी आपणास विद्यापीठातर्फे नियमानुसार कार्यक्रम झाल्यानंतर बिल सादर केल्यानंतर अनुदान देण्यात येईल.

या अनुषंगाने आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना तसेच सामाजिक संस्थांना व अधिकृत ज्येष्ठ नागरीक संघाना आवाहन करण्यात येते की, ज्येष्ठ नागरीकांशी संबधित उपक्रम आपल्या महाविद्यालय/ संस्था/अधिकृत ज्येष्ठ नागरीक संघ यांना आयोजित करावयाचा असल्यास नियम, अटी व शर्थी पुर्ण करणा-यांनी तसा प्रस्ताव विभागाकडे पाठवावा.

प्रस्तावात कार्यक्रमाचे सविस्तर स्वरुप, उद्दिष्ट, कार्यक्रम कोणासाठी आयोजित करणार, कार्यक्रमास किती ज्येष्ठ नागरीक व व्यक्ती सहभागी होतील तसेच कार्यक्रम अर्धा किंवा एक दिवसाचा असेल काय याबाबत याची सविस्तर माहिती द्यावी. कळावे.

अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग कबचौउमवि, जळगाव येथे संपर्क साधावा.

कळावे!

**आपला विश्वासू,**

**(प्रा.मनिष आर. जोशी)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**प्रत:-** पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

**Phone-0257-2257415/416** **वेबसाईट-nmu.ac.in**
**FAX-0257-2258403-406** **ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**